दाखल दिनांक : ३१/१२/२०१३
नोंदणी दिनांक : ३१/१२/२०१३
निकाल दिनांक : १७/११/२०१४
कालावधी : ०० वर्ष.
१० महिने.
१६ दिवस.

**विशेष न्यायाधीश पुणे (लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कायदयाअंतर्गत) यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी— सौ. प्राची पी कुलकर्णी)

**स्पेशल केस कमांक १४८/२०१३** **निशाणी कमांक**

**फिर्यादी** — महाराष्ट् सरकार
तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी
सांगवी पोलीस स्टेशन, पुणे

**विरुध्द**

**आरोपी** — श्रीधरण तंम्बा मारी
वय — ४५ वर्ष, धंदा — नोकरी
रा. मोरया निवास, आर्शिवाद गॅस
एजन्सी जवळ, भोसरी, पुणे

**भारतीय दंड विधान कलम ३५४ व बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वये असलेला गुन्हयाचा खटला**

.........................................................................................................
सहायक सरकारी वकील श्री जाधव फिर्यादी पक्षातर्फे
आरोपीतर्फे श्री ए डी धेंडे वकील

---

**न्या य नि र्ण य**
(आज दिनांक १७ नोव्हेंबर २०१४ रोजी घोषित)

आरोपी विरूध्द् भारतीय दंड विधान कलम ३५४ व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला.

२) अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे आहे. फिर्यादी सुशिल शांतीलाल शहा हे भोसरी पुणे येथे राहण्यास असून ते त्यांचे घरी पत्नी भावना, मुलगी रिया वय — १४ वर्ष व मुलगा रिषी वय — १२ वर्ष यांचेसह राहातात. त्यांची मुलगी रिया ही अल्फान्सो हायस्कुल काळेवाडी येथे सन २०१३ साली इयत्ता

९ वीत शिक्षण घेत होती. दिनांक १९/७/१३ रोजी सकाळी ते घरी असतांना त्यांना अल्फान्सो हायस्कुल मधुन मुख्याध्यापकांचा फोन आला म्हणून ते शाळेत भेटण्यासाठी गेले. तिथे रियाची टिचर जयश्री मॅडम व रिया हजर होत्या. त्यावेळी मुख्याध्यापकांनी दिनांक १८/७/१३ रोजी सकाळी ८.३० वाजता रियाच्या बाबतीत काय घटना घडली हे रियाला विचारा असे सांगितले. त्यावेळी रियाने त्यांना सांगितले की ती क्लासची वॉलेंटीयर आहे व दर दोन दिवसांनी पी टी चे टिचर श्रीधरण यांना रिपोर्ट देत होती. त्याप्रमाणे दिनांक १८/७/१३ रोजी ती सकाळी श्रीधरन सरांना रिपोर्ट देण्यासाठी गेली असता त्यांनी तीला स्पोटरूममध्ये जाण्यास सांगितले. ती स्पोर्टरूममध्ये गेली असता श्रीधरन सर तिथे आले व त्यांनी तिचा जबरदस्तीने हात पकडुन तीला बाजुला ओढुन तीच्या हातावरून हात फिरवुन जवळ ओढण्याचा प्रयत्न करून दोन ते तीन वेळा तीचा किस घेण्याचा प्रयत्न केला त्यामुळे ती घाबरून त्यांना धक्का मारून क्लासमध्ये पळत निघुन गेली. जेवणाच्या सुट्टीनंतर जयश्री मॅडम क्लासमध्ये आल्यावर त्यांना तीने घ ाडलेला प्रकार सांगितला. जयश्री मॅडम तीला घेवून मुख्याध्यापकांकडे गेल्या व त्यांना घ ाडलेला प्रकार सांगितला अशी हकीगत मुलीने त्यांना सांगितल्यावर मुख्याध्यापकांनी तीचा लेखी जबाब घेतला व त्यावर त्यांनी तिघांनी सहया केलया. शाळेने त्यांना सदर शिक्षकावर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यामुळे त्यांनी पोलीसात तक्रार केली नाही. त्यानंतर दिनांक <u>२२/७२१३</u> रोजी अल्फान्सो शाळेमध्ये चौकशीसाठी गेले असता त्यांच्याकडुन दोषी शिक्षकावर कारवाईबाबत समाधान झाले नाही व त्यांनी कारवाई न केलयामुळे दिनांक १/८/१३ रोजी त्यांनी सांगवी पोलीस स्टेशनमध्ये सदर घटनेची फिर्याद दिली.

३) सदर फिर्यादीवरून आरोपींविरूध्द् गुन्हा क्रमांक २८१/१३ अन्वये नोंद करण्यात आला. सांगवी पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक एम बी तडाखे यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी आरोपीला अटक केली, साक्षीदारांचे जाबजबाब घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला, पिडीत मुलीच्या वयाचा दाखला प्राप्त केला व गुन्हयाचा तपास पुर्ण करून आरोपीविरूध्द् न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

४) या न्यायालयाने विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५४ तसेच लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वये

निशाणी क्रमांक २ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपीने त्याच्याावर असलेले आरोप नाकारले व खटल्याच्या सुनावणीची मागणी केली. त्याविषयीची त्याची जबानी निशाणी ३ नुसार नोंदविण्यात आली.

५) प्रस्तूत खटल्यामध्ये आरोपी विरूध्द्चा गुन्हा सिध्द् करण्याकरीतात अभियोग पक्षाने पिडीत मुलगी रिया सुशील शहा हिची साक्ष निशाणी ४ प्रमाणे नोंदविली. फिर्यादी पिडीत मुलीचे वडील सुशिल शांतीलाल शहा यांची साक्ष निशाणी ५ प्रमाणे नोंदविण्यात आली. सदर साक्षीदारांची सरकार पक्षास मदत न केल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सरकार पक्षाने नोंदविलेल्या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूध्द् काहीही न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६) वरील सर्व बाबींवरून खालील मुददे माझया विचारार्थ उपस्थीत झाले. त्या मुदयांवरील निष्कर्ष खाली दिलेल्या कारणमिमांसेत मी नमुद केलेले आहेत.

| **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दिनांक १८/७/१३ रोजी ८.३० वाजण्याच्या सुमारास अलफान्सो हायस्कुल काळेवाडी पुणे येथे आरोपीने पिडीत मुलगी कु. रिया वय – १४ वर्ष हिला स्पोर्टरूममध्ये बोलावून जबरदस्तीने तिचा हात पकडून जवळ ओढून तिचा किस घेण्याचा प्रयत्न करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन तिचा विनयभंग केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३५४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय? | ..... नाही |
| २ वरील तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने पिडीत मुलगी रिया वय – १४ वर्ष हिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तीला स्पोर्टरूममध्ये बोलावून जबरदस्तीने तिचा हात पकडून जवळ ओढून तिचा किस घेण्याचा प्रयत्न केला व त्यायोगे लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय ? | ..... नाही |
| ३ आदेश ? | ..... अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा कमांक १ व २ करीता</u> —**

७) आरोपीविरूध्द् दोषारोप ठेवण्यात आलेले दोन्ही मुद्दे एकाच घटनेतून उद्भवले असल्याने त्यांचा एकत्रित विचार केला आहे. आरोपी विरूध्द्चा गुन्हा सिध्द् करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ रिया सुशिल शहा या पिडीत मुलीची साक्ष नोंदविली. तीने आपल्या साक्षीमध्ये दिनांक १८/७/१३ रोजी श्रीधरन सरांनी तिला स्पोर्टर्स रूममध्ये थांबायला सांगितले. तिथे आरोपीने तिचा हात धरला व तिचा किस घेण्याचा प्रयत्न केला असे काही घडले नसलयाचे सांगितले आहे. सरकारी वकीलांनी साक्षीदाराचा उलटतपास घेतला परंतु त्यामध्ये सरकार पक्षास सहायय होईल असे काही आले नाही. उलटतपासात तिने सांगितले की आरोपी विरूध्द् तिची कसलीही तक्रार नाही.

८) साक्षीदार क्रमांक २ सुशिल शांतीलाल शहा हे पिडीत मुलीचे वडील आहेत. त्यांनी देखील फिर्यादीमध्ये नमूद घटना घडली नसल्याचे सांगितले. तसेच आरोपी तिच्याशी वाईट वागला असे काही घडले नसलयाचे सांगितले. सरकारी वकीलांनी या साक्षीदाराचाही उलटतपास घेतला परंतु त्यामध्ये सरकार पक्षास सहायय होईल असे काही आले नाही. उलटतपासात त्यांनी सांगितले की पोलीसांनी त्यांना बोलावले व त्यांची सही घेतली होती. फिर्यादीतील मजकूराविषयी त्यांना माहिती नाही. त्यांची व त्यांच्या पत्नीची आरोपी विरूध्द् त्यांची कसलीही तक्रार नाही.

९) फिर्यादी व पिडीत मुलगी स्वप्नाली यांनाच आरोपी विरूध्द् कसलीही तक्रार नाही. या दोन साक्षीदारांच्या पुराव्या व्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादी व पिडीत मुलीशी गैरवर्तन केले असे शाबीत होत नाही. अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीं विरूध्द् गुन्हा शाबीत करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ व २ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरादाखल मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे —

**आदेश**

१. आरोपी श्रीधरन तंम्बा मारी याला भारतीय दंड विधान कलम कलम ३५४ व लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष सोडण्यात येत आहे.

.सदरची दुरूस्ती नि.१ वरील आदेशान्वये दिनांक २५/३/१५ रोजी केली.

२. त्याचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ अ अन्वये रूपये १५०००/— चा जामीन बंधपत्र दयावा.

पुणे
दिनांक — १७/११/२०१४

(सौ प्राची पी. कुलकर्णी)
विशेष न्यायाधीश, पुणे
लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून
सरंक्षण कायदयाअंतर्गत

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word for word as per original Judgment.

**Name of Stenographer : M.R. Saptarshi**
**Court Name : Sou. Prachi P. Kulkarni**
**District Judge-1 & Special Judge**
**Pune**

**Date – 17/11/2014**

**Judgment signed by the Presiding officer –17/11/2014**

**Judgment uploaded on -17/11/2014**